ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# आधुनिक काळातील बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये संगीत कलाकाराची भूमिका

सोनाली ब. आसरकर
सहायक प्राध्यापक, संगीत विभाग ,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

## प्रस्तावना



गिडींग्ज या समाजशास्त्रज्ञाच्या मतानुसार समाज हा एक संघ आहे, एक संघठन आहे ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती ही औपचारिक रित्या परस्परांशी संबंधीत असते. कुटूंब व्यवस्था, जाती, वर्ग, संस्कृती किंवा विविध संस्थाच्या आधारावर समाजातील व्यक्तिंमध्ये काही औषचारिक व अनौपचारिक जे केवळ समाजाप्रती असलेल्या आस्थेमुळे संबंध प्रस्थापित झाले असतात.

समाजातील व्यक्ती ही मूल्य, संस्कृती, परंपरा, यांची देखील जपणूक करीत असते. भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेले संगीत हे समाजिकतेच्या दृष्टीने महत्वाची भूमिका बजावताना दिसते. म्हणूनच समाजशास्त्र दृष्टीकोनातूनही संगीत कलेला समजून घेणे ही महत्वाचे ठरले आहे. आधुनिक काळात संगीत हे केवळ कला व सौदर्य यावर आधारीत नसून ते समाजातील आर्थिक स्थिती, सामाजिक संरचना त्याचप्रमाणे सांस्कृतिक संस्थामुळे देखील प्रभावित झालेले दिसते. आज मानवी स्वभाव तसेच समाज हा विविध समस्यांनी ग्रासलेला आहे. हया समस्या जाणून घेवून समाजशास्त्रीय दृष्टीकोन सुदृढ करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे संगीताच्या दृष्टीने देखील सामाजिक स्थिती जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे. संगीत कलाकाराचा विचार केल्यास त्याची कलाकृती ही मुल्यवान किंवा मूल्यहीन बनविण्यामध्ये समाजातील व्यक्तींचा महत्वाचा सहभाग असतो. तेव्हा बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये कलाकार व त्याचे समाजातील व्यक्तिशी असलेले संबंध, जिवीका, मानसिकता या सर्वांचा विचार करणे आवश्यक आहे. एक सुदृढ समाज तयार होण्यामध्ये करावाराची भूमिका निश्चितच महत्वाची आहे.

## आधुनिक काळातील बदलती सामाजिक स्थिती व संगीत

आधुनिक काळातील सामाजिक स्थितीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की हा काळ सामाजिक संक्रमणाचा काळ ठरलेला आहे. हे संक्रमण मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात अमूलाग्र परिवर्तन झालेले आहे. स्वातंत्र प्राप्तीकरीता ज्या व्यक्तींनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्याबारोबरच समाजातील अनिष्ठ चालीरिती, अंधश्रध्दा, सती – प्रथा, जाती प्रथा यासारख्या समाज विृघातक गोष्टींचा समूळ नाश केला. निश्चितच या आंदोलनातही संगीत कलेचा योग्य असा उपयोग झालेला दिसतो. मानवी जीवनातील सुख दुःख हे संगीतामुळे स्वरलारींमध्ये प्रवाहीत होत असते. म्हणूनच देशभक्तीचा गीतांच्या माध्यमातून सामान्य जनतेमध्ये चैतन्य व स्फूती त्याचबरोबर स्वातंत्र प्राप्तीकरीता करावयाच्या आंदोलनाचा आधारस्तंभ हा संगीत दिसून येतो.

देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर समस्त जनतेमध्ये राष्ट्रीयतेची भावना निर्माण होवून राजनैतिक एकता स्थापन होवू लागली. परंतु भारतीय समाजामध्ये एक परिवर्तन झालेले दिसले. सामंतवादाची जागा पूंजीवादाने घेतल्याने एकोणीसाव्या शतकापर्यंत संगीत जे केवळ मनोरंजन व विलासीनतेचे साधन बनले होते त्याला कालंतराने सामाजातील काही धनाढय वर्गाने सांगीतला व संगीत क्षेत्रातील कलाकाराला प्रोत्साहीत केले व हळू हळू समाजात संगीताला उत्कृष्ठ स्थान प्राप्त झाले. विशेषतः भारतीय शास्त्रीय संगीताकडे समाजातील लोक कलेच्या दृष्टीने पाहू लागले. इतर विषयांप्रमाणेच संगीत कलेमध्ये एखादया व्यक्तीने मिळविलेले नैपुण्य म्हणजे त्याची ती अतिरिक्त योग्यता मानली गेली. समाजातील मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय विृद्यार्थी मोठया संख्येने संगीत कलेचे धडे घेवू लागले. संगीतात अंतर्भूत गायन, वादन, आणि, नृत्य या तीनही कलांच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला.

भारतीय संस्कृती व सभ्यता यांचे जतन करुन समाजामध्ये त्याविषयी भावना जागृत करण्याचे श्रेय टिळकांना जाते. लो. टिळकांनी त्यावेळी गणेश उत्सवांसारख्या धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून सामान्य जनतेला एकत्र आणण्याचे मोठे कार्य केले. हया उत्सवांचे एक मोठे आकर्षण म्हणजे संगीत हे होते. संगीताचे वेगवेगळे कार्यक्रम हया उत्सवांदरम्यान होत असल्याने मोठयामोठया कलाकारांच्या सादरीकरणाचा आनंद समाजातील लोकांना घेता येत होता. कलाकार जितका श्रेष्ठ तितकी त्याची कलाकृती देखील श्रेष्ठ आहे ही भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण झाल्याने दर्जेदार रसिक देखील तयार झाले. उत्तम कलाकृतीत प्राप्त झालेला दर्जेदार रसिक वर्ग म्हणजे उत्कृष्ट कलाकार असल्याची पावतीच असते. यामुळे लोकांच्या संगीताकडे बघण्याच्या दृष्टीकोनातही परिवर्तन होवू लागले. केवळ कीयात्मक पक्षातूनच संगीत हे जन समान्यांपर्यंत पोहचवून लोकप्रिय झाले नाही तर वृत्तपत्रे, मासिके इ. च्या माध्यमांतून संगीतावरील लेख प्रकाशित होवून संगीताच्या सैध्दांतिक पक्षाचे देखील ज्ञान सामान्य लोकांना होवू लागले. अनेक दिग्गज गायक कलाकारांच्या कार्यक्रमातील गायनाचे समीक्षण, जाणकार अशा समीक्षकांकडून होवू लागले. त्यामुळे कलाकाराला आपली कला प्रदर्शित करताना निश्चितच फायदा झाला.

आधुनिक काळातील संगीत क्षेत्रात झालेला अमूलाग्र बदल म्हणजे संगीत हे घराणेदार परंपरेत सीमीत न राहता शिक्षण क्षेत्रात शाळा, महाविद्यालये, विश्वविद्यालयीन स्तरावर अभ्यासक्रमातील एक विषय म्हणून गणले जाउ लागले. याव्दारे नवनवीन कलाकार, जाणकार, रसिक समाजामध्ये मोठया प्रमाणात दिसू लागले. अनेक संगीत शाळांची स्थापना झाल्यामुळे अध्ययन, चिंतन व मनन या तिनही बाबींचा सुरेख मेळ येथील वि़द्यार्थ्यांच्या अंगी दिसून येतो जो कलाकार घडविण्याच्या किंवा घडण्याच्या दृष्टीने आवश्यक असतो.

या कार्याचे श्रेय पं. भातखंडे व पं पलुस्कर यांना जाते ज्याच्यापुढे संगीतकार, गायक, कलाकार यांना समाजात सन्मान व प्रतिष्ठा लाभली. कलाकारांच्या मनोवत्तीतही पूर्वीपेक्षा आज बदल झालेला दिसतो. पूर्वी कलाकार हा थोडा संकुचित किंवा ईर्षात्मक मनोवृत्तीचा दिसून येई संगीत हे घराणेदार चौकटीत असल्यामुळे गायक कलाकार देखील आपल्या जवळील कला ही आपल्यापुरताच सीमीत ठेवित असत परंतू शिक्षण क्षेत्राातही संगीताचा समावेश झाल्यामुळे व समाजातील जन सामान्यापर्यंत संगीताच्या व्यापक स्वरुपाचा  प्रचार व प्रसार झाल्यामुळे गायक कलाकारांना सोयी उपलब्ध करुन दिली. यामुळे गायक कलाकारांच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला तसेच जाणकार अशा श्रेष्ठांसमोर प्रस्तूतीकरणाचा आनंद मिळाला. रसिक श्रोत्यांच्या संख्येतही वृध्दी झालेली दिसते. प्रचार व प्रसार माध्यमांमुळे जन सामान्यांपर्यंत संगीत पोहोचत असल्यामुळे लोकांमध्ये संगीताविषयी रुची निर्माण होउन चांगल्या प्रस्तुतील उत्तम असा प्रतिसाद मिळू लागला.

***बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये कलाकारांची भूमिका –***

संगीत आणि समाज याचा विचार केल्यास समाजातील एक महत्वाचा घटक म्हणजे संगीत कलाकार होय. कलाकाराला सामाजिक आंतरदृष्टी असते. एक संवेदनशील व्यक्तीमत्व कलाकाराजवळ असल्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांचा विचार तो करीत असतो. संगीत कला ज्या मानसीकतेतुन निर्माण होते. ती मानसिकता कलाकार व श्रोता या समाजातील दोन्ही घटकांमध्ये दिसुन येते. म्हणुनच कोणत्याही समजिक स्थितीमध्ये कलाकाराची भुमिका अतिशय महत्वाची आहे.

पुर्वीपासुनच सामाजिक स्थितीमध्ये जसेजसे परिवर्तन होत गेले. तसेतसे संगीतातही परिवर्तन झालेले दिसते. सामाजिक मान्यता मिळालेली कलाच मनुष्य अधिक उत्साहाने शिकण्याचा प्रयत्न करीत असतो. व ती कला जास्तीत जास्त लोकांना आवडेल याचा सतत प्रयत्न करीत असतो. समाज देखील त्याच कलाकाराला त्याची कला अधिक उत्कृष्ट होण्याकरिता प्रोत्साहित करीत असतो. तेव्हा कलाकाराच्या कलाकतीवर समाजाने, श्रोत्यांनी टाकलेला विश्वास हा टिकवुन ठेवणे तसेच सुदृढ असा समाज घडविण्याकरीता उत्तम कलाकृतींची निर्मिती करणे ही कलाकाराला आवश्यक आहे.

सामाजिक स्थिती ही काळानुसार बदलत गेलेली दिसते. पुर्वी स्वामी हरिदास व तानसेन यांनी रचलेली धृपदे व धृपद गायन शैली मागे पडुन ख्याल गायकीत परिवर्तीत झाली, प्रसिध्द फ्रांसीसी विचारवंत त्यांच्या मतानुसार एका काळात काही प्रधान विचार असतात. त्याचा एक बैध्दीक साचा असतो. जो संपुर्ण सामाजिक चिंतनाला प्रभावीत करीत असतो.जसे मुगलवालीन संगीत व साहित्य प्रकारांत श्रृंगारीकतेला महत्व दिले गेले. त्यानुसार ख्याल गायनातही श्रृंगारिक रचनांचा अधिक प्रमाणात प्रयोग होत होता. हया श्रृंगारिक काव्यामुळे ख्याल गायकीकडे बघण्याचा अंदाज काही अंशी बदललला होता. तेव्हा या संदर्भात एक विचारधारा प्रवाहित होवून भारतीय संस्कृतीला अनुसरुन सूरदास, तुलसीदास, मीराबाई, इत्यादी संतांच्या रचना ख्याल गायन शैलीमध्ये बांधल्या गेल्या व शास्त्रीय संगीताला एक नवीन दिशा मिळाली. याचे श्रेय पं. विष्णू दिगंबर पलुरकर यांना जाते. तसेच काही कलाकार दार्शनिक व भक्तीपर काव्याचा उपयोग करुन आपले गायन प्रभावी सिध्द करतात.

एखादा विचार ज्याप्रमाणे समाजात रुढ होवून समाजातील लोकांना प्रेरीत करीत असतो. त्याप्रमाणे संगीत कलाकारात देखील आपल्या उत्कृष्ट व प्रभावी गायनामुळे श्रोता, समाज यांच्यावर उत्तम कलाकृतीची छाप पाडत असतो. तेव्हा कोणत्याही परिस्थितीत कलाकाराने अभिजात संगीत टिकवून ठेवण्याकरीता सतत प्रयत्नशील राहणे आवश्यक असते. आज आधुनिक काळात काही संगीत कलाकाराने अभिजात संगीत टिकवून ठेवण्याकरीता असत प्रयत्नशील राहणे आवश्यक असते.

आज आधुनिक काळात काही संगीत तज्ञांनी व कलाकरांनी आपली कला ही उपजीविकेचे साधन मानली आहे. पूर्वी आश्रयदाता हे संगीत कलाकारांना मोठया सन्मानाने दरबारात गायक म्हणून ठेवीत असत व त्यांना त्याचे वेतनही मिळत होते. परंतु आजच्या काळात संगीत कलेचे रसिक तसेच उपासक, श्रोता वर्ग हाच संगीत कलाकाराजवळील कलेला प्रोत्साहित करतो व यामुळेच एक कलाकार म्हणून आपला मार्गक्रम यशस्वी करता येतो. सीडीज, दुरदर्शन, रेडिओ, रिआलिटी शोज यासारख्या प्रसार माध्यमांव्दारे कलाकार रसिकांच्या मनावर राज्य करीत असतो. त्यामुळे आज रसिक श्रोते व प्रसार माध्यमे ही संगीत कलाकारांचे संरक्षक ठरले आहेत, व याचा उपयोग आर्थिक मिळकत म्हणून कलाकाराला होतो आहे.

कलाकाराने यानुसार सामाजिकतेचा व आजच्या श्रोत्यांच्या आवडीचा विचार जरुर करावयास पाहिजे. परंतु यामुळे आपल्या अभिजात संगिताल जे भारतीय संस्क ृतीचे याविभाज्य अंग आहे विसरुन चालणार नाही. याउलट ते आधिकाधिक श्रोत्यांना कसे आवडेल. व कशा प्रकारे समाज त्याकडे आकर्षिक होईल याकरीता प्रयत्न करायला पाहिजे. आणि हे केवळ कलाकारच सहजरित्या करु शकतात. आज समाजातील युवकांना पाश्चात्य संगीताचा ठेका आवडतो तेव्हा या ठेक्याचा भारतीय संगीताचा मेळ साधून अनेक मोठमोठे कलाकार प्रयोग करीत आहेत. व ते यशस्वी होतात आहे. या माध्यमातूनच ते भारतीय संगीत नवयुवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

***निष्कर्ष :–***

आधुनिक काळात बदलत्या सामाजिक स्थितीनुसार संगीतामध्ये परिवर्तन झालेले दिसते. संगीत ही परिवर्तनशील कला आहे. आजच्या कलाकाराने समाजातील संगीत प्रेमींच्या बदलत्या आवडीप्रमाणे भारतीय अभिजात संगीताच्या आधारेच परिवर्तनाचा स्विकार करुन कलाकार आपले कलाकृती सादर करण्याची भुमिका ठामपणे बजावीत आहेत.

***संदर्भ ग्रंथ :–***

1.संगीत का समाजशास्त्र सत्यवती शर्मा, पंचशिल प्रकाशन, जयपूर.
2.भारतीय संगीत और वैंश्वीकरण, डॉ. कु. आकांक्षी, कनिष्क पब्लिशर्स डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली.
3.संगीत कलाविहार अंक,

